अभ्यासपूर्ण व सैद्धांतिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण होते. ते समाजातील बहुआयामी विषयांशी निगडित असे विचार त्यांनी मांडले. त्याचे लिखान केवळ अर्थशास्त्रीय म्हणून नव्हते तर ते एक कायदेपंडित, तत्त्ववेत्ते, राजकीय, विश्लेषक समाजशास्त्री त्याचबरोबर ते राष्ट्रनिर्माते व राष्ट्रभक्त होते. त्यांनी लोकसंख्या नियंत्रण कृषी विषयक दृष्टीकोण, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, दारिद्र्य निर्मुलन, सामूहिक शेती, रिझर्व बँकेची निर्मिती विम्याचे राष्ट्रीयीकरण अशा अनेक गोष्टी भारतीयांना दिल्या आहेत म्हणून ते खरोखरच महान दृष्टे युगपुरुष होते. त्यांच्या कार्याचे वर्णन शब्दात करणे अपुरे पडेल. त्यांनी मांडलेले विचार आजच्या नवीन युगातही लागू पडणारे आहेत. त्यांनी जे आर्थिक विचार मांडले त्यातून नवभारत निर्माण होत आहे. त्यांचे विचार आजच्या काळात तंतोतंत लागू पडतात यावरून ते खरोखरच एक जागतिक ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ होते.

**संदर्भ :—**


१) अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास: पी.आर. कुमानांचे, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

२) आर्थिक विचारांचा इतिहास: विजय कविमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

३) योजना मासिक डिसेंबर २००८.

४) w.w.w.Brambedkar.in


□□□

27

2021-22

# महात्मा गांधीची ग्रामस्वराज्याची संकल्पना


**डॉ. काकासाहेब जी. पोकळे**
संशोधन मार्गदर्शक, सहा. प्राध्यापक,
एन.एस.एस. आर कला व विज्ञान महाविद्यालय
चौसाळा, ता.जि.बीड


**********


**सारांश:**

प्राचीन काळापासून भारत **'खेडयांचा देश'** म्हणून ओळखला जातो खेडयांच्या विकासासाठी 'ग्राम स्वराज्य' संकल्पना मांडली होती. **'ग्राम'म्हणजे 'खेडे'** किंवा गांव होय. स्वराज्य म्हणजे केवळ परकिय गुलामगिरीतून स्वातंत्र्य प्राप्त होणे एवढाच अर्थ गांधीजींना अभिप्रेत नव्हता. स्वराज्याचा त्यांना अभिप्रेत अर्थ अधिक व्यापक होता. स्वांत्र्याचा लाभ तळातील व्यक्तीपर्यंत पोहोचणे म्हणजे खरे **'स्वराज्य'** होय असे त्याना वाटत होते.स्वराज्यात सर्वांचा विकास झाला पाहिजे. देशतील मूठभर लोकांना स्वातंत्र्याचा लाभ होत असेल तर त्याला स्वराज्य म्हणता येणार नाही. मोजक्या लोकांच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण झाल्यास सर्वांचे हित साध्य होणार नाही. राज्यकारभारात सर्व लोकांचा सहभाग असायला हवा. त्यासाठी गांधीनी राजकिय व आर्थिक विकेंद्रीकरणाचा विचार मांडला. ग्रामस्वराज्य म्हणजे गावाची सत्ता गावांतील लोकांच्या हातात असणे होय.

गांधीजींनी ग्रामविकासाची जी परिकल्पना बनविली होती ती एक आदर्श आणि समग्र विकासाची परिकल्पना होती.'खेडयांकडे चला' हा संदेश गांधीजीनी दिला होता. सत्य आणि अहिंसेविषयी मानवजातीला भवितव्य नाही असे त्यांचेचं मत होते. सत्य आणि अहिंसा ग्रामजीवनातील साधेपणातूनच प्रत्यक्षात आणता येतील.गांधीजी वास्तविक खेडी हाच देशाच्या पाठीचा कणा आहे. जर खेडे नष्ट झाले तर भारत नष्ट होईल.

मग तो भारत राहणार नाही, त्याचे स्वत:चे जगातले कार्य गमावले जाईल. खेडयांचे पुनरूज्जीवन करणे शक्य आहे, मात्र त्यांचे शोषण थांबले पाहिजे.

**प्रस्तावना:**

महात्मा गांधीनी ग्रामस्वराज्यात भारतातील खेडयांची पुनर्रचना करण्याचा विचार व्यक्त केलेला आहे. नवभारत निर्माण करायचा असेल तर आमचा दृष्टिकोन साफ बदलला पाहिजे. खेडे हा देशाचा पाया आहे. खेडयांला केंद्रबिदू मानून देशाचा विकास केला पाहिजे. त्यासाठी आर्थिक,सामाजिक आणि राजकिय व्यवहारांत इंचाइंचाने आपल्याला लोकसत्तेची बांधणी करीत जावे लागेल. या कामाची महत्ता लक्षात घेता या प्रश्नाला हात घालण्याकरिता साहजिकच फार खंबीर ह्रदयाची गरज आहे. शहरे आपली देखभाल करण्यासाठी समर्थ आहेत. त्यामुळे खेडेगावांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.ग्रामविकासाची आवड असणाऱ्या कार्यकर्त्यांनी खेडयांतील लोकांचा दृष्टिकोन बदलून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महात्मा गांधी म्हणतात. आम्ही शहरवासीयांनी कधीही यांची चौकशी करण्याचा प्रयत्न केला नाही की, गरीब ग्रामीण लोकांजवळ खाण्यासाठी अन्न व अंगावर घालण्यासाठी कपडे याची व्यवस्था आहे किंवा नाही. आता त्यांच्यासाठी आपण जीवन देण्याची वेळ आली आहे.

भारतात आदर्श खेडे उभे करण्याचा विचार गांधीनी व्यक्त केलेला आहे. ते म्हणतात, भारतातील आदर्श खेडयांची रचना अशी असेल की, जेथे संपूर्ण स्वच्छता असेल, तेथील घरांत पुरेसा प्रकाश आणि हवा असेल आणि आसपासच्या पाच मैल अंतरातील उपलब्ध सामान वापरून घरे बांधलेली असतील. घराला अंगण असेल त्यात घरमालकाला त्याच्या वापरासाठी भाजीपाला लावता येईल. गुरांचा गोठा करता येईल. तत्कालीन खेडयातील घरे आरोग्याच्या दृष्टिने लाभदायक नव्हती. खेडयांच्या पुनर्रचनेचा विचार मांडताना गांधीजींनी आरोग्यदायी घरे बांधण्याचा विचार व्यक्त केलेला आहे. खेडयांतील गल्ल्या आणि रस्ते धुळीपासून मुक्त असतील. गावाच्या गरजेप्रमाणे गावांत विहिरी असतील आणि त्या सर्वांना वापरता येण्यासारख्या असतील. सर्वांसाठी प्रार्थना स्थळे असतील,एक सार्वजनिक सभागृह असेल. गावची गुरे चरण्याकरिता एक सामायिक कुरण असेल, सहकारी दूध पुरवठा केंद्र असेल, प्राथमिक व माध्यमिक षाळा असतील, औद्योगिक शिक्षणाला मध्यवर्ती स्थान असेल आणि गावाकरिता पंचायत असेल ती तंटे मिटवीत. गाव आपले धान्य, भाजीपाला आणि फळे स्वत:च पिकवील, तसेच आपल्याला लागणारी खादी काढील ही माझी नमुनेदार गावाविषयीची सामान्य कल्पना आहे.

आदर्श गावाची उभारणी कारण्यासाठी खेडयांत काम करणारे तळमळीचे कार्यकर्ते हवेत असे गांधीजींनी म्हटले आहे. कोणत्या गोष्टी खेडयात करण्यासारख्या आहेत, यांचा विचार करून त्यासाठी चिकाटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रारंभी थोडे अपयश आले तरीही खचून जाऊ नये. भारतातल्या खेडयांत ग्रामोद्योगांचे पुररूज्जीवन केल्याशिवाय मरणोन्मुख झालेल्या खेडयात जीव येणार नाही. षहरी औद्योगिकीकरण खेडयांच हिताचे नाही. आज खेडयांना जीवनावश्यक गोष्टीकरिता शहरांवर अवलंबून राहावे लागत आहे. तसे राहावे न लागता खेडयांतच शक्य तेवढया गरजा भगातील हे लक्षात घेउन ग्रामपुर्रचना करणे आवश्यक आहे असे गांधीजींना वाटते.

**शेती विकास:**

भारतातील खेडयांत शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. गांधीजी म्हणतात, भारताचा आत्मा गावांत राहातो, शेती विकास हीच भारताच्या विकासाची गुरूकिल्ली आहे, भारत आपल्या खेडयांवर अवलंबून आहे. शहरांच्या अनेक गरजा खेडयांतून भागविल्या जातात. देशातील शंभरातील त्र्याहत्तर टक्के माणसे शेतकरी आहेत. भारतीय शेतकरी गरीब आणि अज्ञानी राहिल्यास भारत तसा राहील. भारत श्रीमंत आहे की गरीब हे शेतकऱ्याच्या उत्पन्नावरून ठरते. लाखोपतीच्या उत्पन्नावरून नव्हे. शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सामान्य शेतकऱ्यांची स्थिती बिघडत चालली आहे. जोपर्यत शेतकऱ्यांची स्थिती शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून कोणी पाहत नाही, तोपर्यत तिचे खरेखुरे चित्र आपल्याला मिळणार नाही, ग्रामीण शेतकऱ्यांच्या स्थितीची जाणीव शहरी सुशिक्षितांना नसते. जोपर्यत

सुशिक्षित वर्ग शेतकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष देण्याचे नाकारतो. तोपर्यंत ती स्थिती सुधारणे अशक्य आहे.

अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वावलंबी बनला पाहिजे. अन्नपुरवठयाकरिता आपण बाहेरच्या मदतीवर अवलंबून राहू नये. आपला देश खंडप्राय आहे. आपली लोकसंख्या खूप मोठी आहे. परक्या राष्ट्राकडे अन्नधान्य मागणे योग्य नव्हे. आपण भिक्षापात्र घेउ नये, त्याने नीतिभ्रष्टता येते. बाहेरच्या मदतीवर अवलंबून राहण्याने देशातल्या देशात ज्या खूप गोश्टी करता येण्यासारख्या आहेत त्यापासून आपण दूर होण्याचा संभव आहे. लागवडीस योग्य जमिनीचा पुरेपूर उपयोग करून अन्नधान्याचे उत्पादन वाढविता येते.गांधीजी म्हणतात, अन्नपदार्थाचे केंद्रीकरण करणे हे घातक आहे असे मला वाटते. विकेंद्रीकरणाने काळया बाजाराला सहजच आळा बसतो, इकडून तिकडे वाहतुकीत होणाऱ्या वेळेच्या आणि पैशाच्या खर्चात बचत होते. शिवाय अन्न कडधान्ये पिकविणाऱ्या खेडेगावच्या माणसाला आपली पिके उंदरा—घुशीपासून कशी वाचवावीत याचे ज्ञान असते, खेडयात अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होऊ शकते. गांधीजींचे मत होते की, शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी सहाकरी तत्वावर शेती केली पाहिजे. एका खेडयांतील शंभर कुटुंबांनी गावची जमिन शंभर तुकडयात कशी तरी विभागून स्वतंत्रपणे शेती करण्यापेक्षा सर्वांनी सामूहिक रीतीने करणे अधिक हिताचे आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ होते.

**सविकेंद्रीत लोकशाही :**

गांधीजींना वाटते,भारताच्या स्वातंत्र्याची सुरूवात तळापासून झाली पाहिजे. खरे स्वराज्य म्हणजे काही थोडया लोकांच्या हाती सत्ता येणे नव्हे तर सत्तेचा गैरवापर झाला असता तिला प्रतिकार करण्याची षक्ती जेव्हा सर्वांच्या अंगी येते तेव्हा ते खरे स्वराज्य आहे. लोकशाही यशस्वी करण्यासाठी मतदार जागृत असले पाहिजेत. केंद्रातील लोक जर बिघडले तर त्यांना बाजुला काढणे हे तळातील लोकांचे कर्तव्य आहे. तळातील लोक अज्ञानी राहिले तर त्यांचा गैरफायदा घेतला जाणारच. गांधीजींनी मतदारांना स्वामी मानले आहे. हे जर हुशार नसतील आणि आळशी असतील तर स्वतःच कायदे मंडळ सदस्यांचे गुलाम बनतील. त्यांच्या हातातले प्यादे बनतील मतदार जर फक्त पाच वर्षांनी मतदानाच्या वेळेला आपली मते नोंदविण्यापूरते जागे झाले तर त्यांचे नोकरी त्यांचे मालक बनतील.

लोकशाही म्हणजे लाकांनी शेळया—मेंढयांसारखे वागणे नव्हे, लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या मतस्वातंत्र्याचे व कृती स्वातंत्र्याच जागरूकपणे संरक्षण झाले पाहिजे. जर तळात बिघाड झाला तरच वरच्या स्तरावर बिघाड होऊ शकतो यासाठी मतदारांच्या अज्ञानपणाला दोश दिला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. भारतीय लोकशाहीला आधारभूत असे ग्रामसमुहाचे स्वशासन ग्रामस्वाराज्यात असावे. गांधीजींना राष्ट्रीय लोकशाहीला अनुकूल अशीच लोकशाही खेडयांत हवी होती.राजकिय पक्ष असू नयेत असे गांधीजींचे मत होत. खेडयांत शहरांप्रमाणे पक्ष आणि गट आढळून येतात ही भारताच्या दृष्टीने शोषनीय गोष्ट आहे. खेडुतांचे हि करण्यापेक्षा पक्ष असू नयेत असे गांधीजींचे मत होते. खेडयांत शहरांप्रमाणे पक्ष गट आढळून येतात ही भारताच्या दृष्टिने खेडयांत राजकारण शिरते तेव्हा गावच्या लोकाच्या उपयोगी पडण्याऐवजी त्यांच्या प्रगतीत खीळ होऊन बसते. ''पंचायत'' या शब्दाला भारतात प्राचीन संदर्भ आहे. गावाचा कारभार पाहण्यासाठी तेथील लोकांनी निवडलेले पाच लोकांचे मंडळ असा त्याचा अर्थ आहे. भारताला ग्राम गणतंत्राचा अनुभव आहे. ग्रामस्वराज्यात गावाचा कारभार पंचायतीच्या माध्यमातून चालविला जाईल.

गावात संपूर्ण लोकशाही असेल आणि ती व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आधारित असेल. तर हिच आपल्या सरकारचा निर्माता असेल. स्वातंत्र्याची सुरूवात तळापासून हाईल. ''प्रत्येक खेडे गणराज्य असेल आणि पंचायत शक्तिशाली असेल. म्हणून प्रत्येक खेडे स्वयंपुर्ण असेल, संपूर्ण जगापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी समर्थ असले.'' प्रत्येक ग्रामवासी स्वतःसाठी आणि गावासाठी प्रांण देण्यास तयार असेल.पंचायतीला कोणतेही फौजदारी अधिकार असणार नाहीत. शिक्षेची तरतूद नसेल. पंचायत गावांतील तंटे मिटविण्याचे काम करील. लोकांनी तंटे करू नयेत हे शिकविणे पंचायतीचे काम आहे काही खर्च न होता गावांत

जलद न्याय मिळेल. गावाला आत्मनिर्भर बनविणे, प्रामाकिपणा आणि उद्यमशीलता याचे पुनरूज्जीवन करणे हे पंचायतीचे काम आहे. गावांतील लोकांच्या गरजेच्या वस्तुंचे उत्पादन वाढविणे, मुलांना मनोरंजन, खेळासाठी मैदान यांची व्यवस्था करणे, याशिवाय जमीन शिल्लक राहिली तर गांजा,तंबाखू, अफू, सोडून इतर नगदी पिके घेता येतील.गावांत एक सभागृह शाळा,शुध्द पाणीपूरवठा इत्यादीची व्यवस्था असेल. गाव अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था समाप्त करेल. सत्याग्रह, असहकार आणि अहिंसा ही शिक्षेची तंत्रे असतील.प्रत्येक गाव एक लोकसत्ताक राज्य व्हायचे असेल तर त्यात जो कोणी शेवटचा असेल तो पहिल्याच्या बरोबरीचा असेल. दुसऱ्या शब्दांत कोणीच पहिला नाही आणि कोणीच शेवटचा नाही. गावांतील सर्व लोक समान असतील. लोक एकमेकांत कोणताही भेदभाव पाळणार नाहीत. सर्व धर्मांचे लोक भाऊ बहिणीप्रमाणे राहतील. वरून जे चित्र सादर केलेल आहे, त्यात कोणतीही गोष्ट अशी नाही जी अशक्य आहे असे आदर्श गाव स्थापन करण्यात व्यक्तीचा संपूर्ण जीवनभराचा काळ लागू शकतो. खऱ्या लोकशाहीचा आणि ग्रामजीवनाचा एखादा प्रेमी व्यक्तीने जर एखाद्या गावाची निवड केली, त्यालाच आपले जग मानून आणि एकमेव कार्य मानून कामाला लागला तर त्याला निश्चितच चांगले परिणाम मिळतील. ''मी वर जे काही म्हटले आहे ते जर आपण करून दाखविले तर भारतातून लोक आपले आदर्श गाव पाहण्यासाठी येतील आणि आपल्याकडून प्रेरणा घेतील.'' गांधीजी स्वप्नदर्शी नव्हते तर एक व्यवहारिक आदर्शवादी होते.

**ग्रामसंरक्षण:**

गावाचे सरंक्षण करण्यासाठी गावांत एक शांतीदल असावे. या दलातील सदस्यांची निवड करतांना त्यांच्या शरीराल महत्व न देता चारित्र्य किंवा आत्मबल याला महत्व द्यावे. या दलातील प्रत्येक सदस्य एकमेकांना चांगल्या रीतीने ओळखत असला पाहिजे. प्रत्येक तुकडी आपला प्रमुख आपणच निवडेल. ही अहिंसक दले दंगे सहज थांबवू शकतील. ग्राम शांतीदलासाठी गांधीजीनी काही नियम सांगितले आहे स्वयंसेवकाने आपल्याजवळ हत्यारे बाळगू नयेत, दलाचा सैनिक सहज ओळखता यावा,प्रत्येकाजवळ मलमपट्या, कात्री, सुई,दोर,शल्यकार्याला लागणारा चाकू इ.प्राथमिक उपचार करण्याकरिता लागणाऱ्या वस्तू असाव्यात, जखमी माणसाला कसे हलवावे आणि न्यावे याचे त्याला ज्ञान असावे, आगी कशा विझवाव्यात,स्वत:ला न भाजू देता आगीच्या क्षेत्रात प्रवेश कसा करावा,सुटका करण्याकरिता उंचावर कसे चढावे आणि माणसाला घेऊन किंवा न घेता सुरक्षितपणे खाली कसे उतरावे याचे चांगले ज्ञान त्याला असावे, आपल्या राहत्या ठिकाणातील सर्व रहिवाशांशी त्याचा चांगला परिचय असला पाहिजे. हिच मुळात एक सेवा आहे.

**सग्रामसेवा आणि ग्रामसेवक:**

गांधीजी म्हणतात,आज आपली खेडी जी उकिरडयाची ढिगारे बनली आहेत, त्यांना आपल्याला आदर्श गांवात रूपांतरित करावयाचे आहे. ग्रामजीवनात अनेक अडचणी आहेत. खेडी समस्याग्रस्त बनल्यामुळे सुधारणेच्या पलीकडे गेलेली आहेत असे म्हणता येत नाही. रोगी बरा होण्यापलीकडे गेला आहे असे म्हणून परिचारिका त्याला कधीही रूग्णालयातून हकलून देत नाही किंवा त्याची सेवा करणे बंद करीत नाही. त्याप्रमाणे ग्रामसेवा करणाऱ्या कार्यकर्त्याने आपले कार्य केले पाहिजे.जुन्या मुरलेल्या रोगाशी आपल्याला झगडायचे आहे,जर आपल्यात धीर आणि सहनशीलता असेल तर अडचणीचे पर्वत सहज ओलांडता येतील.

खेडयांत काम करणाऱ्या सेवकाने राजकारणात पडू नये. त्याने निवडणूकीच्या मोहिमेत भाग घेऊ नये. त्या गावांतील गटा—तटांत भाग घेऊ नये. ग्रामसेवा करणाऱ्यांने एका ग्रामसेवकाची गरज आहे. ग्रामसेवा करण्यास उच्चशिक्षित व्यक्तीच असावी असे नाही. ज्याला ग्रामीण समस्याचे व त्यातून मार्ग काढण्याचे ज्ञान आहे अशी व्यक्ती ग्रामसेवा करण्यास पात्र ठरू शकते. खेडयांतील लोकांत मिळून—मिसळून राहून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याची कला त्यांच्याकडे असली पाहिजे. बौध्दिक श्रम आणि षारीरिक श्रम यात त्याने भेद करू नये. खेडयांत तो शिक्षक म्हणून गेला असला तरी तितकाच विद्यार्थी म्हणूनही गेला असेल. नि:स्वार्थ सेवाभावाने प्रेरित झालेले कोणीही स्त्री किंवा

पुरूष ताबडतोड ग्रामसेवेचे काम सुरू करू शकतात. ग्रामसेवा करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या कामास कशी सुरूवात करावी याविशयी गांधीजीनी मार्गदर्शन केलेले आहे.

**ग्रामीण शिक्षण:**

भारतात एका शतकाहून अधिक काळ ज्या शिक्षण पध्दतीचा प्रसार झाला ती पध्दती मुळात एका विशिष्ट हेतूपूर्तीकरिता योजलेली होती. भांडवलशाहीचे स्वार्थ पोसण्याकरिता भारताचे एकंदर आर्थिक जीवन बदलुन टाकण्यात आले, खेडे हे गुरूत्वाकर्षणाचा मध्यबिंदु न राहता शहर हे मध्यबिंदु बनले. या एकांगी अर्थरचनेच्या गरजा पुरविण्याकरिता सध्याची शिक्षणपध्दती आखण्यात आली. ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीची शिक्षणपध्दती भारतात रूजविली. ग्रामजीवनाला उपयुक्त असे शिक्षण त्यातुन मिळाले नाही. यापध्दतीने पांढरपेशी वर्गाची निर्मिती करून श्रम करणाऱ्यांची अवहेलना केली आहे. बौध्दिक श्रम आणि शारीरिक श्रम यांच्यात फारकत केली आहे. ती शिक्षण पध्दती खेडयांच्या विकासासाठी कुचकामी ठरली आहे.

**सप्रौढ शिक्षण:**

''साक्षरतेचे मोजमापकरण्याचे लक्षावधी खेडुतांमध्ये सर्वत्र आढळणाऱ्या अज्ञानाचे पुरेसे मोजमाप होत नाही.'' शिक्षण हे ज्ञान मिळविण्याचे साधन आहे पण निरक्षर व्यक्तीही ज्ञानी बनू शकते असे गांधीजींना वाटते. त्याला पुस्तकी शिक्षणाशिवाय कृतीतूनही ज्ञान देता येते. म्हणून प्रौढांच्या शिक्षणाच्या बाबतीतसुध्दा अज्ञान घालविण्याचा सखोल कार्यक्रम आपल्याकडे पाहिजे. प्रौढांचे ज्ञान वाढविण्यासाठी ग्राम प्रदर्शन आयोजित केले पाहिजे. ग्राम प्रदर्शनात आदर्श गावांतील परिस्थिती आणि मागास गावांतील परिस्थिती यांच्यातील तफावत ग्रामस्थांच्या नजरेस आणून द्यावी.त्यादृष्टिने प्रयत्न झाल्यास अधिकाधिक गावांना प्रेरणा मिळू शकते. प्रौढ शिक्षणाने स्त्री–पुरूष हे चागले नागरिक बनले पाहिजे. प्रौढ शिक्षणात शेतीला भाग महत्वाचा आहे. कारण बहुसंख्य ग्रामीण लोक शेतीव्यवसाय करताता. प्रौढ शिक्षणाचे स्वरूप जर यथायोग्य असेल त्याने अस्पृश्यता व जातीयता यांच्या मुळावरच घाव घातला पाहिजे. खेडयांतल्या लोकांत वाचता येणारे कमीच असतात. त्यात वाचलेले समजणार आणखी कमी असतात. स्त्रिया तर निरक्षरच असतात. आता त्या लोकांकरिता एखादे छोटेसे पुस्तकालय पाहिजे. ती पुस्तके त्यांना समजतील अशी पाहिजेत.

**अस्पृश्यता निवारण:**

महात्मा गांधीनी अस्पृश्यतेला हिंदू धर्मावरील कलंक मानले होते. ती लवकरात लवकर नष्ट झाली पाहिजे असे त्यांचे मत होते. ते म्हणतात,''उच्चनीच भेदभाव ठेवावा असा कुठलाही धर्म शिकविणारच नाही. अस्पृश्यता हिंदू परंपरेत घुसलेले एक दुदैव आहे.ती धर्माच्या शरीरावरचे गळू आहे, ते नष्ट करायलाच हवे. अस्पृश्यता निवारणाचे काम गांधीजींच्या लेखी केवळ समाजसुधरणेचेच काम नव्हते तर ते त्याला एक अध्यात्मिक काम मानीत.'' जन्माचे कोणी उच्च किंवा नीच होत नाही. ईश्वराची सर्व मुले सारखीच आहेत. अस्पृश्यतेची भावना लोकांच्या मनातून घालविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ''गांधीजींची साबरमीती नदीच्या किनाऱ्यावर आश्रम चालू केला आणि सर्वांना सांगितले की, कोणी हरिजन आश्रमात येऊन सामील होऊ इच्छित असेल तर त्याला अत्यंत आनंदाने सामील करून घेतले जाईल. गांधींनी अस्पृश्यता निवारणाला स्वत:पासून स्वत:च्या कुटुंबापासून व स्वत:च्या आश्रमापासून सुरूवात केली. ते जेथे जातील तेथे अस्पृश्यता संपविण्याचे विचार मांडले १९३२ मध्ये अस्पृश्यता निवारण करण्यासाठी हरिजन सेवक संघाची स्थापना केली. त्या माध्यमातून हरिजन हिताचे व अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य हाती घेतले.

**जातीव्यवस्थेला विरोध:**

अस्पृश्यतेप्रमाणेच गांधीजींनी जातीव्यवस्थेला विरोध केला होता. माझ्या आदर्श खेडेगावांत आजच्यासारख्या अनेक जाती असणार नाहीत असे त्यांनी म्हटले होते. ''बापूजी जातीव्यवस्थेच्या पूर्णत: विरोधी होते.'' नसमाजाच्या उभारणीसाठी सर्वांनी कार्य हाती घेतले पाहिजे असे त्यांचे कत होते. विद्यार्थ्यांसाठी विधायक कार्यक्रम आखून देताना गांधीजींनी म्हटले होते की, माझे विद्यापीठ वेगळया प्रकारचे आहे. माझ्या संशोधन कार्यास येऊन मिळण्याचे माझे त्यांना कायमचे आमंत्रण आहे.

2021-22



सदंर्भ ग्रंथः—

धर्माधिकारी, भाऊ **ग्रामस्वराज्य**, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन,कोथरूड, पुणे,१९९५.

गांधी मो.के, **विधायक कार्यक्रम**,पां.ग.देशपांडे , नवजीवन प्रकाशन,अहमदाबाद,१९४६

पानसे, रमेश,**नयी तालीम:गांधीप्रणीत शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास**,डायमंड पब्लिकेशन,पुणे, प्रस्तावना,

प्रभू,आर.के व राव,यू.आर,**महात्मा गांधी के विचार**,नेशनल बुक ट्रस्ट इंडिया,दिल्ली,१९९४

शर्मा,ज्योती,**भारतीय शासन एवं प्रशासन का स्वदेशीकरण**,जितू पब्लि.जयपुर,२००९

**महात्मा गांधी यांचे संकलित वाङ:मय खंड—१६**अनु दा.न.शिखरे, संचालक, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्रराज्य,मुंबई जानेवारी,१९६८

शिखरे दा.न.**महात्मा गांधींची अमृतवाणी**, महाराष्ट्र गांधी स्मारक निधि प्रकाशन,पुणे

**गांधी विचार दर्शन, शिक्षण विचार, खंड—११** ग.वि.अकोलकर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन,कोथरूड, पुणे,१९९५.

**महात्म गांधी यांचे संकलित वाङ्:मय खंड—४१** श्री.मा.वि.माने, महात्मा गांधी वाङ:मय प्रकाशन समिती, मुंबई,१९७७

❑❑❑

**28**

# पूण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक कार्ये

**सतिश शंकरराव पोंधे**
ता सिंदखेडराजा, जि.बुलडाणा महाराष्ट्र

**डॉ. काकासाहेब जी. पोकळे**
संशोधन मार्गदर्शक, सहा. प्राध्यापक,
एन.एस.एस. आर कला व विज्ञान महाविद्यालय
चौसाळा, ता.जि.बीड

**********

**अहिल्याबाईनी भारतभर बांधलेली व जिर्णोध्दार केलेली मंदिरे :—**

**१. सारांश :**

तत्कालीन कालखंडात भारताची राजकीय आणि सामाजिक स्थिती अतिशय गंभीर होती.

अहिल्याबाई होळकरांवर लहाणपणापासूनच धार्मिक संस्काराचा प्रभाव पडला. त्या अव्वल दर्जाच्या मुत्सदी राजकारणी अत्यंत न्यायप्रिय व कार्यक्षम होत्या. त्यांनी हिंदू — मुस्लीम असा भेतभाव न करता सर्वधर्म समभाव आपल्या राज्यात प्रस्थापित केला. त्यांनी प्रजेच्या नैतिक आणि अध्यात्मिक न्तीकडेही लक्ष दिले. त्यांच्या राजयात प्रजेला सुरक्षितता वाटत होती. त्यांनी मानवधर्म शोधावयाचा प्रयत्न केला. त्या धार्मिक होत्या परंतू धर्माध नव्हत्या. ठिकठिकाणी मंदिरे, धर्मशाळा, दर्गा, मस्जिद, अन्नछत्र, तलाव बांधले. त्यांनी संपूर्ण भारतभर बांधलेली व जिर्णोध्दार केलेली मंदिरे जणसामान्यासाठी खुली केलीत.

तत्कालीन कालखंडात मंदिरे बांधाव्यामागचा उद्देश हा असे की मंदिरातुन प्रबोधन, कथा, किर्तन, चर्चा, जौतपंचायतीच्या सभा, न्यायनिवाडा करणे इत्यादी असल्यामुळे मंदिरांना संस्कार व केंद्राचे व ज्ञानपीठाचे स्वरूप प्राप्त झालेले होत विविध अहिल्याबाईनी

2021-22



सदंर्भ ग्रंथ:—

धर्माधिकारी, भाऊ ग्रामस्वराज्य, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन,कोथरूड, पुणे,१९९५.

गांधी मो.के, **विधायक कार्यक्रम**,पां.ग.देशपांडे , नवजीवन प्रकाशन,अहमदाबाद,१९४६

पानसे, रमेश,नयी तालीम:गांधीप्रणीत शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास,डायमंड पब्लिकेशन,पुणे, प्रस्तावना,

प्रभू,आर.के व राव,यू.आर,**महात्मा गांधी के विचार**,नेशनल बुक ट्रस्ट इंडिया,दिल्ली,१९९४

शर्मा,ज्योती,**भारतीय शासन एवं प्रशासन का स्वदेशीकरण**,जितू पब्लि.जयपुर,२००९

**महात्मा गांधी यांचे संकलित वाङ:मय खंड—१६**अनु दा.न.शिखरे, संचालक, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्रराज्य,मुंबई जानेवारी,१९६८

शिखरे दा.न.**महात्मा गांधींची अमृतवाणी**, महाराष्ट्र गांधी स्मारक निधि प्रकाशन,पुणे

**गांधी विचार दर्शन, शिक्षण विचार, खंड—११** ग.वि.अकोलकर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधी भवन,कोथरूड, पुणे,१९९५.

**महात्म गांधी यांचे संकलित वाङ:मय खंड—४१** श्री.मा.वि.माने, महात्मा गांधी वाङ:मय प्रकाशन समिति, मुंबई,१९७७

□□□

28

# पूण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक कार्ये

**सतिश शंकरराव पोंधे**
ता सिंदखेडराजा, जि.बुलडाणा महाराष्ट्र

**डॉ. काकासाहेब जी. पोकळे**
संशोधन मार्गदर्शक, सहा. प्राध्यापक,
एन.एस.एस. आर कला व विज्ञान महाविद्यालय
चौसाळा, ता.जि.बीड

**********

## अहिल्याबाईनी भारतभर बांधलेली व जिर्णोध्दार केलेली मंदिरे :—

### १. सारांश :

तत्कालीन कालखंडात भारताची राजकीय आणि सामाजिक स्थिती अतिशय गंभीर होती.

अहिल्याबाई होळकरांवर लहाणपणापासूनच धार्मिक संस्काराचा प्रभाव पडला. त्या अव्वल दर्जाच्या मुत्सदी राजकारणी अत्यंत न्यायप्रिय व कार्यक्षम होत्या. त्यांनी हिंदू — मुस्लीम असा भेतभाव न करता सर्वधर्म समभाव आपल्या राज्यात प्रस्थापित केला. त्यांनी प्रजेच्या नैतिक आणि अध्यात्मिक न्तीकडेही लक्ष दिले. त्यांच्या राजयात प्रजेला सुरक्षितता वाटत होती. त्यांनी मानवधर्म शोधावयाचा प्रयत्न केला. त्या धार्मिक होत्या परंतू धर्मांध नव्हत्या. ठिकठिकाणी मंदिरे, धर्मशाळा, दर्गा, मस्जिद, अन्नछत्र, तलाव बांधले. त्यांनी संपूर्ण भारतभर बांधलेली व जिर्णोध्दार केलेली मंदिरे जणसामान्यासाठी खुली केलीत.

तत्कालीन कालखंडात मंदिरे बांधाव्यामागचा उद्देश हा असे की मंदिरातुन प्रबोधन, कथा, किर्तन, चर्चा, जातपंचायतीच्या सभा, न्यायनिवाडा करणे इत्यादी असल्यामुळे मंदिरांना संस्कार व केंद्राचे व ज्ञानपीठाचे स्वरूप प्राप्त झालेले होत विविध अहिल्याबाईनी

बांधलेल्या या मंदिरांचा उपयोग नृत्य, गायन, वादन, शिल्पकला, वास्तुकला, चित्रकला, मुर्तीकला अशा कलांना या मंदिर बांधवीच्या कामामुळे उत्तेजन मिळाले. रोजगार उपलब्ध झाला.

हजारो वर्षापासुन धार्मिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या तत्कालीन समाजव्यवस्थेला वैचारिक धार्मिक पार्श्वभूमी प्रदान करण्याचे महत्वपूर्ण कार्य अनेक महापुरूषांनी केले आहे. होळकर साम्राज्यातील रणरागिनी पूण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्यापैकीच एक होत्या.

**प्रस्तावना :**

देशभरातील मंदिरांच्या जिर्णोध्दाराचे काम अहिल्याबाईनी हाती घेतले होते. धर्मशाळा, घाट, विहिरी, तलाव, भोजनशाळा यांची उभारणी केली या गेलेल्या तिर्थक्षेत्रांना त्यांनी उजाळा दिला.

लोकमाता राजमाता, पूण्यश्लोक, देवी, मातोश्री अशी विविध संबोधने जनतेनी अहिल्याबाईंना दिली. कारण त्यांची प्रजावत्सलता, अचुक न्यायदाण आत्मविश्वास, राज्यकारभाराची जाण, आणि माणुसकीशी घट्ट असणार अस परदु:खकातर असं मन! त्यांची जिदी बाणेदार वृत्ती आणि साधी राहणी व कल्याणकारी विचारसरणी अहिल्याबाई म्हणजे एक चालती बोलती गाथच होती.

बालपणापासुन अहिल्याबाई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांचे धार्मिक कार्ये असेतूहिमाचल पसरलेले आहे. त्यांनी केलेले कार्य हे जातीधर्मात अडकलेले नाही. सर्व धर्मियांसाठी त्यांनी मदत केली. म्हणून केवळ ''धार्मिक'' एवढीच त्यांची ओळख नाही. त्यांच्या दुरदृष्टीमुळे त्यांनी केलेले कार्य आजही जिवंत आहे त्यांच्या या कर्याचा सर्वसामान्यांना विसर पडू नये असे मला वाटते. त्यांच्या धार्मिक कार्याचा आढावा आपण त्यांनी बांधलेल्या मंदिराच्या माहितीद्वारे बघणार आहोत.

**चौंडी येथे अहिल्याबाईनी बांधलेली मंदिरे :**

अहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव चौंडी हे गांव अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यात आहे. जामखेड पासून ३० कि.मी. अंतरावर चौंडी गाव आहे. या गावी हरणा व सीना या दोन नद्यांचा संगम असून सीना नदीच्या उजव्या तीरावर हे गाव वसलेले आहे. अहिल्याबाईच्या या जन्मगावी वडिलांचे घर, गढी, जीर्णावस्थेत शिल्लक आहेत. त्यांच्या माहेरचे वंशज अद्यापही या गावी राहतात. त्यांची आठवी पिढी असून गोविंदराव शिंदे या गावचे पाटील आहेत. या आपल्या जन्मगावी अहिल्याबाईनी शनेश्वर महादेव मंदिर, अहिलेश्वर महादेव मंदिर आणि चौंडीदेवी मंदिर अशी तीन मंदिरे बांधली आहेत.

**१) शनेश्वर महादेव मंदिर :**

'शनेश्वर महादेव मंदिर ६००० रूप्ये किंमतीचे पक्के शिखरबंद बांधले' चौंडी या गावी ६००० रुपये खर्च करून अहिल्याबाई होळकर यांनी शनेश्वर महादेवाचे मंदिर बांधले. हे मंछिर पूर्वभिमूख असून ४ ते ५ फूट उंच दगडी जोत्यावर बांधण्यात आले आहे. तीन पायऱ्या चढून गेल्यावर दगडाचा चौथरा आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम काळया पाशाणाचे आहे. सुरूवातीस एक सभामंडप असून या सभामंडपात उंच दगडी चौथऱ्यावर पाशाचा नदी स्थानापन्न आहे. मंदिराचे प्रवेशद्वार दगडी कमानीचे असून दरवाजा लाकडी आहे.

**२) अहिलेश्वर महादेव मंदिर :**

जामखेडहून चौंडीस येताना लांबूनच हे मंदिर दृष्टीस पडते 'श्री अहिलेश्वर मंदिर २०,००० रु. खर्च मंदिर शिखरबंद व अष्टपैलू चबुत्रा असून आतल्या बाजूस श्री शंकराची स्थापना केलेली आहे तसेच ती अहिल्याबाइ यांची मूर्ती पार्थीव पूजा करून राहिले आहे' अहिल्याबाईनी २०,००० रुपये खर्च करून हे मंदिर बांधलेले आहे.

**३) चौंडी देवी मंदिर :**

चौंडी देवी हे चौंडी गावाचे ग्रामदैवत आहे. प्राचीन काळापासून आहे यासाठी मंदिर अहिल्याबाईने बांधले. 'श्री चौंडीदेवी मंदिर १४००० रुपये सदरहू मंदिर पक्के शिखरबंद आहे.' या मंदिरासाठी तत्कालीन कालखंडात १४००० रुपये खर्च केले होते. चौंडीदेवी मंदिर पूर्वाभिमुा शनेश्वर आणि अहिलेश्वर या मंदिराप्रमाणेच हे मंदिरही उंच जोत्यावर बांधण्यात आलेले आहे.

**पंढरपूर येथे अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेले मंदिरे :**

**१) श्री विठ्ठल मंदिरास अहिल्याबाई यांनी दिलेल्या**

**देणग्या :**

विठ्ठल हे या देशातील अनेक कष्टकरी माणसांचे दैवत आहे. पंढरपूरला आणि विठ्ठलाला प्राचीन काळापासून फार मोठा इतिहास आहे. वर्षातून ज्या दोन आषाढी व कार्तिकी या वाऱ्या भरतात त्या दोन यात्रांना संपूर्ण देशातून अनेक जाती – धर्माचे लोक येतात. त्यातून देशाची राष्ट्रीय एकात्मता साध्य होते. तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ या थोर संतानी संपूर्ण समाजव्यवस्थेला जीवनाचा क्षरा धर्म काय असतो याचे महत्तव पटवून देऊन संपूर्ण भारतभर समतेचा संदेश दिला. साने गुरूजी यांनी दलितांना मंदिर प्रवेश व्हावा म्हणून पंढरपूरत उपोषण केले. अशा प्रकारच्या अनेक ऐतिहासिक घटनांचा क्रम या पंढरपूरला आहे. पंढरपूर शहराची वाढ आणि विकास झाला तो विठ्ठल मंदिरामुळे, तेथील लोकांना रोजगार उपलब्ध झाला. अनेक लहान–मोठे उद्योग उभे राहिले. अशाप्रकारच्या अनेक तीर्थक्षेत्राचे महत्तव ओळखून अहिल्याबाईनी तेथे मंदिरे बांधली तेथील लोकांच्या सोयीसाठी घाट, धर्मशाळा, अन्नछत्र सुरू केल. अशाच प्रकारे पंढरपूरचे तीर्थक्षेत्राचे महत्त्व ओळखून मल्हारराव होळकर, अहिल्याबाईनी तेथे देणग्या दिल्याचे उल्लख सापडतात व काही ठिकाणी शिलालेख ही आहेत.

**२) पंढरपूर येथील राममंदिर :**

अहिल्याबाईनी यात्रेकरूंची सोय व्हावी म्हणून तेथे एक वाडा बांधला आहे.वाड्यत अहिल्याबाईनी पंढरपूर येथील होळकर वाड्यत शिवमंदिर बांधण्यासाठी पाया खोदला परंतु पाया खोदताना मारुतीची मुर्ती सापडली म्हणून अहिल्याबाईनी या ठिकाणी शिवमंदिर न बांधता राममंदिर बांधले आणि या मंदिरासमोरच मारुतीचे लहानशे मंदिर बांधले.

**नाशिक येथील मंदिरे :**

महाराष्ट्रातील नाशिक हे एक तीर्थक्षेत्र आहे ते गोदावरी नदीच्या काठी वसले आहे. याला महाराष्ट्रातील दक्षिण काशी नावाने संबोधले जाते. नाशिक येथे कुंभमेळा भरला होता. या तीर्थक्षेत्री अहिल्याबाईनी अनेक मंदिरे बांधली आहेत त्याचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे.

**१) अहिल्याराम मंदिर :**

नाशिक येथील बहुतांश मंदिरे रामाची असून अहिल्याबाई होळकर यांनी सुध्दा गोदावरी काठी पंचवटी घाटावर अहिल्याराम मंदिर बांधले आहे.

**२) विश्वेश्वर मंदिर :**

विश्वेश्वर मंदिर पंचवटी घाटावर काळया पाषाणात बांधण्यात आले आहे.

**संगमनेर येथील अहिल्याबाई यांनी बांधलेले अहिल्याराम मंदिर :**

संगमनेर येथे पाच नद्यांचा संगम झालेला असल्यामुळे या गावाला संगमनेर असे म्हणतात. याठिकाणी अहिल्याबाई होळगर यांनी अहिल्याराम मंदिर बांधले आहे.

**१) जेजुरी (महाराष्ट्र) येथील मंदिरे :**

जेजुरी हे गाव पुण्याच्या अग्नेय दिशेस ३० मैल अंतराव आहे. जेजूरी येथे कऱ्हे पठार व किल्ला — कोट अशा दोन ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत. हे जेजुरीच्या नैऋतेस सुमारे चार मैलावर उंचीच्या डोंगरावर आहे. कडे पठारावरून पूर्व व ईशान्य दिशेच्या सुमाराने सरळ चालत व पायऱ्या चढून गेल्यावर जेजुरीच्या खंडोबाचे सध्याचे टेकडीवरील देवालय लागते याचे बांधकाम सुभेदार मल्हारराव होळकरांनी केले आहे. उत्तर दरवाजाने मंदिरात जाण्यास ३८५ पायऱ्या अहिल्याबाई होळकरा यांनी बांधलेल्या आहेत.

**२) जेजुरी येथील विठ्ठल मंदिर :**

जेजुरी या ठिकाणी अहिल्याबाईनी विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर बांधलेले आहे हे मंदिर २८ बाय २० अशा लांबी रुंदीचे आहे.

**३) मारूती मंदिर :**

चांवड येथे अहिल्याबाई होळकरांनी मारुती मंदिर बांधले आहे. मारुती मंदिर चांदवड गावाच्या बाहेर आहे. मंदिराचे प्रवेशद्वार दक्षिणेला आहे. संपूर्ण मंदिराचे बांधकाम काळया पाषाणाचे प्रवेशद्वार दगडी महिरपीचे असून त्यावर नक्षीकाम कोरण्यात आलेले आहे.

**४) कृष्ण मंदिर :**

चांदवड येथील जुन्या महालात राधाकृष्ण मंदिर अहिल्याबाईनी बांधलेले आहे. या मंदिराचे बांधकाम लाकडाचे आहे. मंदिरास प्रशस्त असा सभा मंडप असून त्याला १२ खांब दगडाचे आहेत. या सभामंडपात

एका बाजूस उंच दगडी चौथऱ्यावर राधाकृष्ण यांच्या कृष्णवर्णीय पाषाणाच्या मूर्त्या आहेत. 'शंकर हरी दिक्षित हे या मंदिराचे पुजारी असून त्याच्यापुर्वीच्या आठव्या पिढीत त्यांच्या वंशजांना हे मंदिर अहिल्याबाईंनी दान दिले होते. अहिल्याबाईंनी या मंदिरासाठी त्यांच्या वंशजाना १५० रुपये वर्शासन दिले होते.' पुजाऱ्याचे वंशज आजही मंदिराची व्यवस्था पाहतात.

**५) पुणतांबे येथील व्यंकटेश मंदिर :**

पुणतांबे हे गाव गोदावरी नदीकाठी वसले आहे. ते अहमदनगर जिल्ह्यात येते. या संपूर्ण गावाला अहिल्याबाईंनी तत्कालीन कालखंडात तटबंदी बांधून दिली. या गावात अहिल्याबाईंनी बालाजी व्यंकटेशाचे मंदिर बांधले आहे.

**महाबळेश्वर येथील रेवाडेश्वर मंदिर :**

महाबळेश्वर महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ व थंड हवेचे ठिकाण आहे. साताऱ्याच्या वायव्येस ५३ कि.मी 'शहरापासून उत्तरेस सुमारे चार कि.मी. वर जुने क्षेत्र महाबळेश्वर आहे यावरून या गिरीस्थानाला महाबळेश्वर हे नाव पडले. महावळेश्वराच्या मंदिराजवळ कृष्णाबाई व अनिबलेश्वर (विष्णु) ही दोन मंदिरे आहेत.'

**किल्लेधारून येथील अंबादेवीचे मंदिर :**

किल्ले धारून हे बीड जिल्ह्यातील तालुक्याचे गाव आहे. या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांनी अंबादेवीचे मंदिर बांधले.

**अहिल्याबाई होळकरांनी बारा ज्योतिर्लिंगापैकी नविन बांधलेली व जीर्णोद्धार केलेली मंदिरे :**

संपूर्ण भारतात बारा ज्योतिर्लिंग आहेत ते पुढीलप्रमाणे : — १) सौराष्ट्र देशात सोमनाथ (गुजरात राज्य), २) श्री शैल पर्वतावर मल्लिकार्जुन (आंध्र प्रदेश), ३) उज्जैनिस महाकाल (म.प्रदेश) ४) ओंकारेश्वर व मंगलेश्वर (म.प्रदेश), ५) परळी वैजनाथ (महाराष्ट्र), ७) रामेश्वर (मद्रास), ८) औढा नागनाथ (महाराष्ट्र), ९) काशी विश्वेश्वर (उ.प्रदेश), १०) त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र), ११) हिमालयाती केदारनाथ (उ.प्रदेश), १२) वेरूळ येथील घृष्णेश्वर (महाराष्ट्र) या ज्योतिर्लिंगापैकी सोमनाथ व काशी येथील मंदिरे अहिल्याबाईंनी संपूर्णपणे नव्यानी बांधलेली आहेत. परळी वैजनाथ, ओंकारेश्वर, ममलेश्वर आणि घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगाचा जीर्णोद्धार केलेला आहे.

**१) सोमनाथ (गुजरात) :**

सोमनाथ हे बारा ज्योतिर्लिंगातील आद्य असे ज्योतिर्लिंग असून भारतातील अतिप्राचीन असे शैवक्षेत्र आहे. 'इ.स.६४९ मध्ये मैत्रिक वंशातील राजा धरसेन याच्या राजवटीस दुसरे दगडी नवे देवालय उभे करण्यात आले. हे मंदिर स्थापत्य कलेच्या दृष्ट्या व कला दृष्ट्या वैभवशाली होते. याचा सभा मंडप उघडा असून त्याच्या पायऱ्या समुद्राकडे होत्या. मंदिराच्या दक्षिणेला समुद्राच्या लाटा अडविण्यासाठी प्रचंड तटबंदी होती.' सोमनाथ मंदिरातील गाभाऱ्यांत रत्नदीपांचा लखलखाट अहोरात्र असायचा, देवाच्या भांडारगृहात अमाप द्रव्याचा साठा होता.

**२) परळी वैजनाथ येथील ज्योतिर्लिंग :**

देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकली महाराष्ट्रात पाच ज्योतिर्लिंग असून मराठवाड्यात तीन ज्यातिर्लिंगे आहेत. परळी वैजनाथ हे ज्योतिर्लिंग बारा ज्यातिर्लिंगातील पाचव्या क्रमाकांचे आहे. परळी हे क्षेत्र बीड जिल्ह्यात असून अंबेजोगाई पासून पूर्वेकडे १५ मैल अंतराव आहे.

अहिल्याबाईंनी जीर्णोद्धार केलेले मंदिर यात अहिल्याबाईचा शिलालेख आहे तो पुढीलप्रमाणे —

प्रसादोनृपशालिवान शके षटशून्य सप्तेदुभि
श्यक्रेयम्प्रमिते भृगौ मधुशुयौ पझे तियौ पंचमे ।।
खंडेराय सुकांतया सुतनया मल्हारी नाम्मो विभो इथे
क्रोभिनि थैव होलकरया कांत्या सुशा अहल्याय ।।

**३) ओंकारेश्वर (मध्य प्रदेश) :**

कावेरी आणि नर्मदा यांचया पवित्र संगमाच्या परिसरात ओंकारेश्वराचे मंदिर आहे. सांप्रताचे ओंकारेश्वराचे मंदिर अहिल्याबाई यांनी बांधलेले आहे.

**४) श्री घृष्णेश्वराचे ज्योतिर्लिंग (महाराष्ट्र) :**

घृष्णेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगातील महत्त्वाचे ज्योतिर्लिंग असून महाराष्ट्रातील पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग होय. वेरूळ हे क्षेत्र औरंगाबाद पासून १८ मैल अंतरावर आहे. औरंगजेबाने दक्षिणेवर स्वारी केली असता इतर देवस्थानाबरोबर घृष्णेश्वर मंदिराचीही मोडतोड केली तेव्हापासून मंदिर भग्न अवस्थेत होते पुढे इ.स.

१७३० मध्ये अहिल्याबाईच्या सासू गौतमाबाई होळकर यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतले आणि ते नंतर अहिल्याबाईने पूर्ण केले असे तेथील शिलालेखवरून कळते.

**अहिल्याबाई होळकरांनी ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणी केलेली कामे :**

अहिल्याबाईनी ज्या ठिकाणी तीर्थक्षेत्र आहेत त्या ठिकाणी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सामाजिक व धार्मिक कार्य केल्याचे स्पष्ट होते त्याच प्रमाणे १२ ज्योतिर्लिंगाच्या ठिकणचे महत्त्व जाणून त्यांनी तेथे धार्मिक कार्य केले आहे. १२ ज्यातिर्लिंगापैकी सोमनाथ, सौराष्ट्र, उ.प्रदेश येथील काशी ज्योतिर्लिंगाच्या देवालयाचे बांधकाम नवयाने केले. म.प्रदेशातील ओंकारेश्वर, ममलेश्वर, तसेच महाराष्ट्रातील परळी वैजनाथ आणि वेरूळ येथील घृष्णेश्वर या मंदिराचा जीर्णोद्धार केला.

**अहिल्याबाईनी महेश्वर राजधानी बांधलेली मंदिरे:**

मध्यप्रदेशातील पश्चिम निमाड या जिह्यातील महेश्वर हे तालुक्याचे ठिकाण आहे. ऐतिहासिक नगरी म्हणून हे ठिकाण आज प्रसिध्द आहे. याचे कारण असे की, अहिल्याबाईनी १९६७ मध्ये आपले राज्यकारभाराचे ठिकाण इंदोरवरून महेश्वर हे केले. ते ठिकाण भौगोलिकदृष्ट्या सुरक्षित आहे. अहिल्याबाईनी तेथे साध्या पध्दतीचा वाडा बांधला तेथे अनेक देवांची मंदिरे बांधली. त्याचबरोबरच मशिदीही बांधल्या. अनेक ठिकाणी घाट, तलाव, रस्ते, विहीर, कुंड बांधले. त्यामुळे महेश्वराचा विकास होवू लागल्या. अहिल्याबाईनी विनकरांना आश्रय दिला. त्यामुळे वस्त्रउद्योग मोठ्य प्रमाणात महेश्वरला चालू झाला. आजही महेश्वर साडी संपूर्ण भारतभर प्रसिध्द आहे. या व्यवसायाचे आधुनिकीकरण होळकराचे वंशज शिवाजी राजे होळकर यांनी केली आहे. रेवा सोसायटी महेश्वर या नावाने साड्यचे उत्पन्न या ठिकाणी चालू आहे. अहिल्याबाईनी अनेक सुविधा उत्पन्न करून दिल्यामुळे व्यापारी तेथे आले. त्यामुळे महेश्वरच्या व्यापार उद्योगाला चालना मिळाली, महेश्वर नगरीचा विकास झाला अशा प्रकारे महेश्वर नगरी अहिल्याबाईनी वसवली आहे.

**१) काशी विश्वेश्वराचे मंदीर, महेश्वर :**

अहिल्याबाईश्ना व मल्जहाररावांना काशीच्या विश्वेश्वराची पुन्हा स्थापना करण्याचा मनोदय होता. मल्हाररावांना मोहिमेमुळे हे कार्य अखेरपर्यंत जमले नाही. अहिल्याबाईनी काशीला विश्वेश्वराची पुन्हा स्थापना केली. हे कार्य अखेरपर्यंत जमले नाही. अहिल्याबाईनी काशीला विश्वेश्वराची पुन्हा स्थापना केली. हे मंदिर संपुर्ण दगडी काळ्या पाषाणात व घडीव दगडात बांधलेले आहे. मंदिराला तीन उंच कळस आहेत. मंदिराचा चौरा साठ फुट उंचीचा आहे. त्याता तिन्ही बाजूनी प्रवेशव्दार आहे. मुख्य गाभाऱ्यात आत शिवलिंग आहे. शिवलिंगाच्या समोर मोठा नंदी व कासव कोरलेला आहे. या संबंधी उल्लेख पुढीलप्रमाणे आहे. 'अहिल्याबाईची स्वारी इंदोरहून महेश्वर संवत १८२४ भाद्रपद मासी इ.स. १७६७ मध्ये येवून राहिली. ' वाडे मंदिरे प्राचीन देवळे कसे कसी बांधविली व स्थापना केली. प्रथम सरकारवाडा बांधविला व स्थापना केली. श्री नर्मदेचा घाट वाड्याखाली बांधला व नंतर काशी विश्वेश्वराचे मोठे देऊळ शिखर बांधवून स्थापना केली. अशा प्रकारे अहिल्याबाईनी विश्वेश्वर मंदिर बांधले.

**भवानी देवीचे मंदिर :**

महेश्वर येथील बस स्थानकाजवळ म्हणजेच गावाच्या उत्तर दिशेला भवानी मंदिर अहिल्याबाईनी बांधलेले आहे.

**अहिल्याबाईनी पिरस्थानांना दिलेल्या नेमणुका :**

अहिल्याबाई होळकरांनी ज्याप्रमाणे हिंदू धर्मातील लोकाच्या निरनिराळ्य देवतांच्या असंख्य मंदिरांची नव्याने उभारणी व जीर्णोद्धार केला. त्याप्रमाणे त्यांनी इतर धर्मातील लोकांचा द्वेश न करता त्यांच्या देवस्थानाला पूजा—अर्चा करण्यासाठी नेमणुका लावून दिल्या. १८ व्या शतकात मोठ्या प्रमाणात धर्मावर आधारित लढाई होत असताना. इतर धर्मातील लोकांना आश्रय दिला. त्यांच्यात भेदभाव केला नाही. त्यांनी धर्मनिरपेक्ष तत्त्वांची अंमलबजावणी १८ व्या शतकातच केली होती. त्यांच्या या धर्मनिरपेक्ष वृत्तीवरून संशोधन अर्थी असे म्हणता येईल की, अहिल्याबाई धार्मिक होत्या. परंतु धर्मांध नव्हत्या.

**चांदवड येथील नानावली बाबाचा दर्गा :**

चांदवड हे अहिल्याबाई होळकरांचे जहागिरीच्या

प्रशासनाचे ठिकाण होते. महेश्वर प्रमाणेच अहिल्याबाई होळकरांनी येथे पुष्कळ मंदिरे बांधली. त्याबरोबरच नानावली बाबांच्या दर्ग्यालादेखील त्यांनी पूजा–अर्चसाठी व्यवस्था करून दिली होती. आजमात्र कागदोपत्री त्यासंदर्भात उल्लेख सापडत नाहीत. अहिल्याबाई तत्कालीन कालखंड त्यावेळी चांदवड मुक्कामी असत त्यावेळी नानावली बाबांच्या दर्ग्याच्या दर्शनार्थ जात असत अशी माहिती तेथील ट्रस्टच्या मॅनेजर यांनी दिली. रंगमहालाजवळच नानावली बाबाचा दर्गा गावातच आहे. दर्गा संपूर्ण कौलारू छताचा आहे. चांदवडला ज्यावेळी उरूस भरतो त्यावेळी सदलचा पहिला मान अहिल्याबाईच्या काळापासून परांपरागत होळकरांचा आहे. आजही तो चालू आहे. रंगमहाल ते नानावली बाबांचा दर्गा असे भुयारी मार्ग आहे. भुयारी मार्ग सध्या बंद करून ठेवला आहे.

**चांदवड येथील बुखारी बाबांचा दर्गा :**

बुखारी बाबाचा दर्गा मुंबई–आग्रा महामार्ग शेजारी असून अहिल्याबाईंनी बुखारी बाबांचा दर्गा त्यांच्याकाळात संपूर्ण बांधून काढला होता, अशी माहिती अहिल्या ट्रस्टचे मॅनेजर देतात. अहिल्याबाईनीच आपल्या कारागीराकडून इतर मंदिराचे बांधकाम चालू असताना दर्गा बांधून घेतला असावा परंतु कागदोपत्री त्याचा उल्लो मिळत नाही.

अशा प्रकारे अहिल्याबाईनी सर्वधर्मीयांसाठी धार्मिक कार्य केले. ज्या ठिकाणी मुस्लिम राजवटीत हिंदूंच्या मंदिराची तोडफोड झाली होती. त्यांचा जीर्णोद्धार केला तर काही ठिकाणी नवीन मंदिरे उभारली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व संस्थानाचे विलिनीकरण झाले. त्यात होळकर संस्थानादेखील विलीन झाले. १९६७ मध्ये होळकर संस्थानच्या सध्याच्या वंशज महाराणी उशाराजे होळकर यांनी खासगी देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटीज ट्रस्ट स्थापन केला व त्यामार्फत संपूर्ण होळकर संपत्तीचा कारभार चालवला जातो.

**निष्कर्ष :–**

१. अहिल्याबाई होळकर यांनी विविध मंदिराचा जीर्णोध्दार व उभारणी करून सांस्कृतिक वारसा जतन केला आहे.

२. नानाविध लोककल्याणकारी कामातून अहिल्याबाईनी सामाजिक हित व प्रतिष्ठा जोपासली आहे.

३. अहिल्याबाई होळकर यांचे धार्मीक क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे.

४. विविधांगी क्षेत्रात अहिल्याबाईनी कार्य केले आहे.

५. सर्वसामान्य, स्त्री–पुरूष किंबहूना सर्वच मानवजातीसाठी अहिल्याबाईनी कार्य केले आहे.

**संदर्भग्रंथ :–**

१. विकिपिडीया

२. विक्रम ना. पाटील — अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व — एक

३. मतकर गणेश — इंदोर का होळकर राजवंश अहिल्याबाई

४. जहागिरदार विजया — तेजस्विनी अहिल्याबाई होळकर

५. ठाकूर वा.वा.— होळकर शाहीच्या इतिहासाची साधने भाग — १ व २

❑❑❑

2021-22

# यशवंतराव यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान


**गणेश रामराव कदम**
एम. ए. नेट सेट, राज्यशास्त्र
(संशोधक विद्यार्थी)

**प्रा. डॉ. के. जी. पोकळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, जि. बीड


**प्रस्तावना**

कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावर अवतरलेलं यशवंतराव चव्हाण हे व्यक्तिमत्त्व संपूर्ण भारतवर्षास आदरणीय असणारं असं व्यक्तिमत्त्व होतं. ***आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार* म्हणून** त्यांचा गौरव केला जातो. महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आलेल्या या व्यक्तिमत्त्वाने महाराष्ट्राची आणि मराठीची अस्मिता आपल्या आयुष्यभर जोपासली. ***"माझ्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मी महाराष्ट्राच्या कल्याणासाठी वारकऱ्याच्या निष्ठेनं काम करीन*** ही त्यांची जाणीव मराठी मनाला उभारी आणणारी आहे. तसेच **"हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री छातीचा कोट करील"** यासारखी त्यांची विधाने महाराष्ट्राच्या पुरुषार्थाची विधाने आहेत.*(समग्र साहित्य सूचीसंपादक: वि. वि. पाटील)*सातारा जिल्ह्याच्या टोकावरील *(सध्या सांगली जिल्हा)*डोंगराच्या कुशीत वसलेल्या देवराष्ट्र्या गावानेआधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावयांच्यावर जन्मगाववआजोळच्या नात्याने उदारमतवादीसंस्कार केले. ***"आधुनिक महाराष्ट्र शिल्पकार","सह्याद्रीपुत्र"," देशातील तीन क्रमांकचा नेता"*** हिबिरुदावली त्यांच्या कार्याला लागली. त्यांच्या जीवनप्रवासातील ***''संयुक्त महाराष्ट्राची चळवळ"*** हा खूप महत्वाचा अध्याय होता.

सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाच्या आधारावर एक राज्य स्थापन करण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला **संयुक्त महाराष्ट्र चळवळ** असे म्हणतात.संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ही स्वातंत्र्य चळवळीनंतरची महाराष्ट्रातील व्यापक लोकसमर्थन असणारी चळवळ होती. हे राज्यातील पुरोगामी चळवळीचे सर्वात मोठे व व्यापक आंदोलन होते. या चळवळीत महाराष्ट्रातील मध्यमवर्ग, कामगार, शेतकरी, विचारवंत आदी समाजातील सर्व स्तर एकत्र आले होते.*(मराठी विश्वकोश संयुक्त महाराष्ट्र आंदोलन)*

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ऐतिहासिकपार्श्वभूमी:-**

1. १९०८:साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात चिंतामणराव वैद्य यांनी मराठी भाषिकांच्या एकीकरणाचा प्रथम उल्लेख केला
2. १९११ :दैनिक केसरी मध्ये न.चि केळकर यांनी मराठी भाषा बोलणाऱ्यांचीसर्व लोकसंख्या एका अंमलाखाली असावी असे मत मांडले.
3. १९१५ :लोकमान्य टिळकांनी भाषावार प्रांतरचनेची मागणी केली.
4. १९२१ :राष्ट्रीय काँग्रेसच्या झालेल्या नागपूर अधिवेशनात महात्मा गांधीजींनी स्वतः काँग्रेसने भाषावार प्रांत रचना करावी हे तत्व मान्य असल्याचा ठराव मांडला.
5. १९२८ :नेहरू रिपोर्टमध्येभाषेवर आधारित प्रांताची रचना करण्याची शिफारस केली होती.
6. १९३८:काँग्रेस वर्किंग कमिटीने आपण सत्तेवर आल्यास भाषावार प्रांतरचना करू असे आश्वासन दिले होते.
7. १९३८ : मुंबई येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनात महाराष्ट्र स्थापनेची मागणी झाली

8. १९३९ :नगर येथील साहित्य संमेलनात सर्व मराठी भाषा प्रदेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला ''संयुक्त महाराष्ट्र'' असे नाव द्यावे असा ठराव केला.
9. १९४० :रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली"**संयुक्त महाराष्ट्र सभा**" ही संघटना स्थापन केली.
10. १९४१ :डॉ.केदार यांच्या नेतृत्वाखाली "**महाराष्ट्र एकीकरण परिषद**" भरली.
11. १९४५-४६ :निवडणूक जाहीरनाम्यामध्ये की कॉंग्रेसने भाषावर प्रांतरचनेचा पुनरुच्चार केला होता.
12. १९४६ :ग त्र्य माडखोलकर यांनी बेळगाव येथील साहित्य संमेलन संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका मांडली.
13. २८ जुलै १९४६ :श्री शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे "**महाराष्ट्र एकीकरण परिषद**" भरली यामध्ये "**संयुक्त महाराष्ट्र परिषदेची**" स्थापना करण्यात आली
14. १९४७:"**दार कमिशन**" भाषिक आधारावर प्रांताची निर्मिती करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने योग्य नाही हा प्रश्न तातडीने हाताळण्याची गरज नाही.
15. ८ऑगस्ट१९४७"**अकोला करार**" :विदर्भातील नेत्यांच्या मनात महाराष्ट्र एकीकरणबाबत विश्वास निर्माण व्हावा यासाठी अकोला करार झाला.
16. २९ डिसेंबर १९४८"**जे.व्ही.पी.समिती**" ("**त्रिसदस्य समिती**") देशांतर्गत व जागतिक फाळणीनंतर देशाच्या परिस्थितीचा विचार करता भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नांचा फेर विचार केला पाहिजे. देशाचे संरक्षण महत्त्वाचे आहे जातीयवाद,प्रांतिकवाद या फुटीर प्रवृत्तींना उत्तेजन देता कामा नये.
17. २८ सप्टेंबर १९५३"**नागपूर करार**":संयुक्त महाराष्ट्राला विदर्भाचा पाठिंबा मिळविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या नेत्यांनी नागपूर करार केला.या करारावर यशवंतराव चव्हाण बॅ. रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, शेषराव वानखेडे, रा. कृ. पाटील, पी के. देशमुख, भाऊसाहेब हिरे, नाना कुंटे, व देवकीनंदन यांच्या सह्या होत्या.
18. २२ डिसेंबर १९५३ :"**राज्य पुनर्रचना आयोग**" ("**फाजलअली कमिशन**").

अध्यक्ष:- फाजलअली.
सदस्य:-ह्रदयनाथ कुंझरू.
सदस्य:- के.एम पन्नीकर.

14 राज्य आणि सहा केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले मराठी व गुजराती भाषिकांचे मिळून "**द्विभाषिक मुंबई**" राज्य करण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेने व यशवंतराव चव्हाणांनी आयोगासमोर संयुक्त महाराष्ट्राच्या राज्याची मागणी केली.
19.८ नोव्हेंबर १९५५ "**त्रिराज्याचा प्रस्ताव**":कॉंग्रेस वर्किंग कमिटीने त्रिराज्याचाठराव पास केला.
20.१ नोव्हेंबर १९५६ :"**द्विभाषिक मुंबई**" राज्याची निर्मिती
21.३०नोव्हेंबर १९५७ :प्रतापगडावर मोर्चा
22.१ नोव्हेंबर १९५८ :माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा संसदेवर काढला.
23.१ मे १९६० कामगार दिनी संयुक्त "**महाराष्ट्र**" राज्याची निर्मितीझाली.

**यशवंतरावचव्हाणआणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ:-**

सुरवातीला द्विभाषिक राज्याला प्रतिकूल असतांना तेच राज्य स्थापन झाल्यावर त्याच राजाच्या मुख्यमंत्री पदाचीजबाबदारी स्वीकारणे हे महाराष्ट्राच्या जनतेच्या दृष्टीने महाराष्ट्राशी केलेला धोका होता म्हणून यशवंतराव महाद्वैभाषिक मुंबईराज्याचे

मुख्यमंत्री झाले आणि "*सूर्याजी पिसाळ*"ही उपमा त्यांनालागली.यशवंतरावांनी मात्र महाराष्ट्र स्थापनेचा लढा काँग्रेसमध्ये राहून अंतर्गत लढायचं ठरवले होते त्यालाअनेक कारण होती त्यापैकीएक म्हणजे १९४६ पासूनच प्रांतिक सरकारात समाविष्ट असलेली काँग्रेस बोटावर मोजता येतील एवढ्या पुढाऱ्यांच्या हातात असलेल्या सध्यस्थितीतीलमहाराष्ट्र काँग्रेसच्या मार्गाने महाराष्ट्र स्थापनेचा लढा पूर्ण होणार नाही हे यशवंतरावांनी ओळखले होत म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्र कॉंग्रेस आपल्या अधिपत्याखाली आली तर वेगवेगळ्या मार्गाने पंतप्रधान नेहरू व केंद्र सरकारची मनधरणी करून महाराष्ट्र स्थापनेला गती देता येईल असा यशवंतरावाचा होरा होता.१९५७ साली यशवंतरावांच्या नेतृत्वात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तेव्हाच्या मुंबई या द्विभाषिक राज्यात कॉंग्रेस सत्तेत आली असली तरी बहुतांश कॉंग्रेस नेत्यांचा पराभव आणि यशवंतराव केवळ ६०० मतांनी निवडून आले होते.

यशवंतराव इतर आमदारांच्या साहाय्याने सत्ता टिकवू शकले होते परंतु त्यांच्याच दृष्टीने पहिले तर हा कॉंग्रेसचा पराभव होता जो यशवंतरावांना कॉंग्रेस मजबूत करण्यासाठी, आपले महाराष्ट्र कॉंग्रेसमधील प्रथम स्थान मजबूत करण्यासाठी आणि त्याचा चतुराईपणाने वापर करूनयशस्वी करून महाराष्ट्र स्थापनेसाठी याचा उपयोगझाला.निवडणुकीतील अपयशानंतर सावध होऊन यशवंतरावांनी पक्षावरील आपली मांड पक्की केली.

आधी ठरवल्याप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वाटानिर्वेध करण्याच्या उद्योगास ते लागले. संयुक्त महाराष्ट्राचे एकेक विरोधक हेरून त्यांनी त्यांना आपलेसे केले व त्यांचा विरोध येनकेन प्रकारे मोडून काढला.मुबईचे भांडवलदार ,मराठी राज्य झाल्यास आपले हितसंबंध दुखावतील ,या भयगंडातून संयुक्त महाराष्ट्राला विरोध करीत होते,विदर्भ आणि मराठवाडाया अविकसित प्रदेशांना महाराष्ट्रात आपल्या विकासाची उपेक्षा होईल, अशी भीती वाटत होती;मोठे महाराष्ट्र राज्य झाल्यास मराठे वरचढ होतील आणि वरचे ब्राम्हण व खालचे हरिजन यांच्यावर अन्याय होईल,अशा भीतीपोटी आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राचे पाच लहान राज्यात विभाजन करावे, अशी सूचना केली होती; **"आम्हा ब्राह्मणांनां मुंबई तरी राहू द्या महाराष्ट्रात आम्हाला जिवंतसुद्धा राहणे कठीण होईल"**,या भाऊ भोपटकर यांच्या विधानातून मराठी उच्चवर्णीयांचे भयकल्पन व्यक्त होत होते.यशवंतरावांनी या सर्वांचे भयनिरसन करण्याचा कसून प्रयत्न केला.

आपल्या कर्तबगारीच्या बळावर यशवंतरावांनी द्वैभाषिकाचा कारभारकार्यक्षम केला.आपल्या समर्थकांप्रमाणे विरोधकांच्याही मनावर आपल्या प्रामाणिकपणाचा व सद्भावनेचा ठसा बसवला.एकाहून एक बलदंड असलेल्या विरोधी पक्षनेत्यांना त्यांनी आपल्या संयत शैलीने जवळ ओढले.त्यांच्या रचनात्मक सूचनांचे स्वागत केले.प्रशासन स्वच्छ व गतिमान करण्याचा कसोशीने प्रयत्न केला .बहुजनीन(कॉस्मोपॉलिटन) बहुरंगी मुंबईचे मनही त्यांनी जिंकून घेतले.

शेतकरी संस्कृतीतून आलेला पुढारी औद्योगिक संस्कृतीच्या अडचणी आस्थेवाईकपणे समजून घेतो,"**शेतकऱ्याचा पोर**"हि प्रतिमा घेऊन सत्तेवर आलेला हा नेता बड्या भांडवलदारांच्या भपकेबाज मेजवान्यांमध्येही न बुजत सहजपणे वावरतो, आणि मराठी बहुजनसमाजाच्या हाती सत्ता जाऊनही आपले हितसंबंध अबाधित राहू शकतात, आसा त्रिविध प्रत्यय आपल्या वागणुकीतून व कारभारातून चव्हाणांनी भिन्नप्रदेशीय वरचढ वर्गांना आणून दिला. या वर्गाचा विश्वास त्यांना संपादिताआला नसता, तर कदाचित संयुक्त महाराष्ट्र होऊच शकला नसता; कारण मुख्य विरोध त्यांचाच होता.

अविकसित व दुर्लक्षित भागांच्या औद्योगिक व व्यापारी विकासासाठी खास प्रयत्न करून चव्हाणांनी विदर्भ-कोकण- मराठवाडा याना आपलेसे करून घेतले आणि संयुक्त महाराष्ट्रात बिनदिक्कत प्रवेश करण्यासाठी अनुकूल अशी त्यांची मनोभूमिका तयार केली.सामाजिक सहिष्णुतेमध्ये त्यांनी महार वतनेरद्द करणे,बौद्ध धर्म स्वीकारणांऱ्या नवदीक्षित दलितांची संरक्षणे व सवलती अबाधित ठेवणे हि त्यांचे निर्णय स्वागतार्ह ठरली.संवरण (को-ऑप्शन),तहकरार (अलायन्सेस) किंवा मलिदावाटप (डिस्ट्रिब्युशन ऑफ फेवर्स)अशा मार्गांनी त्यांनी असंतुष्टांची बंडखोरी काबूत आणली.शेतीवर आधारित उद्योगिकीकरण,आधुनिक शेती, भूसुधार, सिंचन, सहकारी पतपेढ्या वगैरे उपाय योजून आपल्या वेगळ्या संस्कृतीची छाप पाडली.

द्वैभाषिक राज्यात एवढी सगळी कामे केल्यानांतर चव्हाणांनी पंतप्रधान नेहरूंच्या निदर्शनास आणून दिले कि द्वैभाषिक राबवणे अशक्य आहे.महाराष्ट्र व गुजरात या दोन प्रांतांचं एकत्रित मनोमिलन घडून येऊच शकत नाही.एकभाषिक राज्यासाठी जनभावना तीव्र होत होती. विरोधकांचा जोर वाढतच होता, एकभाषिक राज्याचे प्रशासन जनजीवनाशी अधिक  समरूप होऊ शकेल आपण निर्णय घेण्यास जास्त हयगय केली तर एवढे योग्य कामे करूनही १९६२ च्या निवडणुकांचे निकाल १९५७ पेक्षाही  भयकर लागतील हि गोष्ट चव्हाणांनी पंतप्रधान नेहरूंच्या कानावर घातली.

नेहरुंनी चव्हाणांनां एका भेटीत विचारले होते, कि
"दोन स्वतंत्र राज्य केली, तर कॉंग्रेस ला बहुमत मिळेल काय?"
यशवंतरावांनी उत्तरे दिले "बहुमत मिळेल"

३०नोव्हेंबर १९५७प्रतापगडाच्या शिवस्मारकाच्या अनावरणप्रसंगीमुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मुद्दाम नेहरूंना त्यासाठी आणण्याचे नियोजन केले महाराष्ट्रातील परिस्थिती त्यांना समजावी ही त्यांची त्यामागे भूमिका होती.जेव्हा नेहरू आले होते, तेव्हा समितीने केलेल्या उग्र निदर्शनातून लोकक्षोभ किती तीव्र आहे याची जाणीव पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना झाली.त्याचे श्रेय जेवढे समितीने केलेल्या निदर्शनाला जाते तेवढेच पंतप्रधानाला राजकीय गणित युक्तीने समजावून सांगणाऱ्या चव्हाणांना हि जाते.

नेहरूंना राज्याला हवे असलेले **मुंबई**नाव वगळून समितीने **"महाराष्ट्र"**असे नाव ठरवले व **"महाराष्ट्र" राज्याची स्थापना १९६० सालच्या कामगारदिनी म्हणजे १ मे १९६० रोजीझाली.*महाराष्ट्र स्थापनेचा कलशमहाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते दिल्लीहून आणला गेला.* नव्या राज्याची मुंबई ही राजधानी व नागपूर उपराजधानी निश्चित झाली.**

## संदर्भसूची


1) "समग्र साहित्य सूची": वि. वि. पाटील.
2) "कृष्णाकांठ": यशवंतराव चव्हाणआत्मचरित्र (खंड पहिला),संगणकप्रकाशन,मंबई.
3) "यशवंतराव चव्हाण" :राजकारण आणि साहित्य,भास्कर लक्ष्मण भोळे साकेत प्रकाशन औरंगाबाद.
4) "मराठी विश्वकोश" :संयुक्त महाराष्ट्र आंदोलन.
5) "सह्याद्रीचे वारे":यशवंतराव चव्हाण,संगणकप्रकाशन,मंबई.
6) "यशवंतराव चव्हाण":आनंदराव पाटील,यशवंतराव प्रतिष्ठान मुंबई.
7) आमचे मुख्यमंत्री: डॉ. रामकृष्ण रायरीकरव डॉ. श्रीनिवास सुरनीस.